**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०९ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **वाहतूक कोंडी आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांमुळे रिक्षा परवान्यांच्या वाटपाला आजपासून स्थगिती.**
2. **पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेसाठी दक्ष असल्याचं परराष्ट्र मंत्र्यांचं संसदेत निवेदन.**
3. **नागपूर इथं राज्यस्तरीय "महालक्ष्मी सरस २०२६" प्रदर्शनाचं आयोजन उद्या पासून १३ दिवस रेशीमबाग मैदानावर होणार.**
4. **अकोला आणि अमरावती जिल्ह्यांत उष्णतेच्या लाटेचा इशारा.**

---

विधी मंडळ

राज्यातल्या शहरांमध्ये होणारी वाहतूक कोंडी आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांमुळे रिक्षाच्या परवान्यांचं वाटप आजपासून स्थगित करत असल्याचं राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी जाहीर केलं. विधानभवन परिसरात वार्ताहरांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. राज्य सरकारनं पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये स्थानिक पातळीवरच्या परिस्थितीनुसार रिक्षांच्या परवान्यासंबंधीचा निर्णय घ्यावा, अशा सूचना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं दिल्या होत्या. १९९७मध्ये घातलेली रिक्षा परवाने वाटपावरची स्थगिती जून २०१७ मध्ये राज्य सरकारनं उठवली होती. यंदाच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार १ जानेवारी २०२६पर्यंत राज्यात १२ लाख ९६ हजार रिक्षा धावत आहेत. राज्यातल्या अनेक शहरांमध्ये वाहतूक कोंडी आणि वायूप्रदूषण होत असल्याच्या तक्रारी येत होत्या. त्यामुळे रिक्षांच्या परवाने वाटपाला स्थगिती देण्याचा निर्णय आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती सरनाईक यांनी दिली. काही अटी-शर्तींची पूर्तता करूनच परवाने देता येतील का, याविषयी केंद्राशी चर्चा सुरू असून त्यानंतरच अंतिम निर्णय जाहीर होईल, असंही ते म्हणाले.

***(होल्ड बाईट - प्रताप सरनाईक १८ सेकंद)***

राज्य महिला आयोगाला पुरेसा निधी मिळत नसून कर्मचाऱ्यांची कमतरता आहे असा मुद्दा विधानसभेत सुधीर मुनगंटीवार, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत मांडला. जनजागृती, संशोधन ही आयोगाची कामं आहेत, मात्र निधी मिळत नसल्यानं ही कामं करता येत नाहीत, असा आरोप पाटील यांनी केला. यावर आयोगाकडून जेवढ्या निधीची मागणी होते, तेवढा निधी दिला जातो, असं राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितलं.

---------------------------------------------

कर्मचारी राज्य विमा

कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या बैठकीत देशभरात १० नवीन वैद्यकीय महाविद्यालयं स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यात महाराष्ट्रातील नागपूर आणि पुण्याचा समावेश आहे. मात्र नागपूरचा प्रस्ताव अद्याप शासनाकडे सादर न झाल्याबाबत आमदार प्रवीण दटके यांनी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करत खंत व्यक्त केली. दटके यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी नागपुरात ESIC (ईएसआयसी) वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचं सांगितलं. प्रस्तावातील तांत्रिक त्रुटी दूर करून तो नव्यानं केंद्र सरकारकडे पाठवण्यात येईल, असं आश्वासन त्यांनी दिलं.हे वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यास एमबीबीएसच्या जागा वाढतील तसंच जीएमसी आणि आयजीएमसीनंतर नागपुरात कामगार रुग्णालयाच्या माध्यमातून तिसरे मेडिकल कॉलेज उभं राहणार असल्याचं दटके यांनी सांगितलं. यामुळे कामगारांना उत्तम आरोग्य सेवा मिळण्याबरोबरच रोजगार निर्मितीलाही चालना मिळणार आहे.

---------------------------------------------

संसद

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामकाजाला आजपासून सुरुवात झाली. राज्यसभेत माजी सदस्य मुकुल रॉय, डॉ. जनार्दन वाघमारे आणि एच. के. दुआ यांना सर्व सदस्यांनी श्रद्धांजली वाहिली. पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर सरकार लक्ष ठेवत असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी दक्ष असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आज राज्यसभेत आपल्या निवेदनात म्हणाले. परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेऊनच संबंधित मंत्रालयं समन्वयानं काम करत आहेत; तसंच, पश्चिम आशियातला तणाव कमी करण्यासाठी सरकारकडून राजनैतिक प्रयत्न सुरूच राहतील, असंही त्यांनी यावेळी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त

अरब अमिराती, कतार, सौदी अरेबिया, ओमान, जॉर्डन, इस्रायल आणि बहरीनच्या राष्ट्रप्रमुखांशी चर्चा केली आणि त्यांना शांततेचं आवाहन केलं, अशी माहितीही जयशंकर यांनी सभागृहाला दिली.

---------------------------------------------

केंद्रीय निरीक्षकांच्या नियुक्त्या

राज्यसभेच्या आगामी द्वैवार्षिक निवडणुकीसाठी भाजपचे अध्यक्ष नितीन नबीन यांनी आज केंद्रीय निरीक्षकांच्या नियुक्त्या केल्या. बिहारमध्ये छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा आणि केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा पक्ष निरीक्षक असतील, तर हरियाणामध्ये गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी, ओदिशामध्ये महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची पक्ष निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

---------------------------------------------

बच्चू कडू

आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वात अमरावती जिल्ह्यात चिखलदरा इथं आयटीआय मैदानावर मागील नऊ दिवसांपासून शेतकरी कर्जमुक्ती आठवण आणि मेळघाट संघर्ष यात्रा आयोजिण्यात आली आहे. मेळघाटातील विविध गंभीर समस्यांवर तोडगा काढण्यासाठी सरकारमार्फत शिष्टमंडळ बैठक होणार आहे. परंतु, या बैठकीत तात्काळ आणि ठोस उपाययोजना जाहीर झाल्या नाहीत, तर मेळघाटातील नागरिकांच्या तीव्र भावना लक्षात घेता चिखलदरा इथं मोठा जनआक्रोश उसळू शकतो, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

***(होल्ड बाईट - बच्चू कडू - २५ सेकंद)***

दरम्यान, आज दुपारी सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आंदोलनस्थळाला भेट दिली.

---------------------------------------------

डॉ.विपीन

नागपूर महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त डॉ. विपीन यांनी आज मनपाच्या ५२ व्या आयुक्त पदाचा भार स्वीकारला. नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांची पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आयुक्तपदी बदली झाल्यामुळे नागपूर महानगरपालिकेच्या आयुक्तपदावर जिल्हाधिकारी डॉ. विपीन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

---------------------------------------------

सरस प्रदर्शन नागपूर

नागपूर इथं राज्यस्तरीय 'महालक्ष्मी सरस २०२६' वस्तू आणि विक्री प्रदर्शनाचं आयोजन येत्या १० ते २३ मार्च दरम्यान रेशीमबाग मैदान इथं करण्यात आलं आहे. या महोत्सवात एकूण 350 स्टॉल लागणार असून त्यापैकी नागपूर जिल्ह्यासाठी 110 स्टॉल्स आहेत. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी या प्रदर्शनाला भेट देऊन विविध उत्पादनांची खरेदी, महाराष्ट्रीय खाद्यसंकृतीचा आस्वाद आणि नामवंत सांस्कृतिक कलाकारांच्या कलेचा आनंद घ्यावा, असं आवाहन नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी आज पत्रकार परिषदेत केलं. यावेळी त्यांनी या आयोजनस्थळी असणा-या सुविधांबाबत माहिती देताना सांगितलं -

***(होल्ड बाईट- विनायक महामुनी - 27 सेकंद)***

महालक्ष्मी सरस प्रदर्शनीचा मुख्य उद्देश देशभरातील स्वयं सहाय्यता समूहांतील महिलांनी आणि ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणं हा आहे. याचबरोबर समूहांतील सदस्यांना विविध राज्यातील उत्पादनं, विक्री आणि बाजारपेठेची माहिती देणं तसंच आंतरराज्यीय संस्कृती, खाद्यपान आणि कलाकुसर यांचा परस्परांना परिचय करून देणं असाही उद्देश आहे. या प्रदर्शनीचं औपचारिक उद्घाटन येत्या 11 मार्च रोजी शहरातील प्रतिष्ठित आणि नामवंत महिलांच्या हस्ते होणार आहे. या प्रदर्शनाची वेळ सकाळी 9 ते रात्री 10 पर्यंत राहणार असून सांस्कृतिक कार्यक्रमांची वेळ संध्याकाळी 7 ते 9 अशी आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, चला हवा येऊ द्या चमू, त्याचप्रमाणं गझल नवाज भीमराव पांचाळे यांच्या कार्यक्रमांचा समावेश आहे.

---

'एचपीव्ही' लसीकरण

महिलांमधील गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावं, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यभर विशेष एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील ज्या मुलींनी वयाची १४ वर्षे पूर्ण केली आहेत, मात्र १५ वर्षे पूर्ण केलेली नाहीत, अशा सर्व मुलींना ही लस शासकीय आरोग्य संस्थांमध्ये पूर्णपणे मोफत दिली जाणार आहे. दरम्यान, समाजमाध्यमांवर या लसीकरण मोहिमेबाबत दिशाभूल करणारे काही व्हिडिओ प्रसारित होत असल्याचं निदर्शनास आलं आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा अफवा आणि नकारात्मक प्रचाराला बळी पडू नये, असं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

---------------------------------------------

मदर टेरेसा व्याख्यानमाला

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ इथं आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रम आणि 'मदर टेरेसा व्याख्यानमाला' आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाला कुलसचिव डॉ.राजू हिवसे, न्यायमूर्ती आर.सी.चव्हाण, प्रमुख वक्ते अमोल पुसदकर, अधिष्ठाता डॉ.मेधा कानेटकर आणि संचालक डॉ.रविशंकर मोर उपस्थित होते. 'विकसित भारत-२०४७: ध्येयापूर्तीसाठी महिलांचे योगदान' या विषयावर महिलांच्या राष्ट्रनिर्मितीतील महत्त्वपूर्ण भूमिकेवर यावेळी भर देण्यात आला. कार्यक्रमात बीएएसएल मधील महिला प्राध्यापकांचा सन्मान करण्यात आला.

---------------------------------------------

हवामान

अकोला आणि अमरावती जिल्ह्यात आज आणि उद्या उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या आणि परवा वर्धा जिल्ह्यात देखील उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे. यादरम्यान नागरिकांनी उन्हापासून बचाव करण्याच्या सूचना प्रशासनातर्फे देण्यात आल्या असून आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. दरम्यान, मागील २४ तासांत विदर्भात 40 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअससह अकोला जिल्हा सर्वाधिक उष्ण ठरला आहे. अकोला पाठोपाठ वाशिम, अमरावती, वर्धा या जिल्ह्यांमध्ये तापमान 39 अंश सेल्सिअस तर बुलढाणा, यवतमाळ, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये 38 अंश सेल्सिअसच्या घरात आहे. नागपुरात आज ३७ पूर्णांक ६ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. येत्या 13 तारखेपर्यंत हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवला आहे.

---------------------------------------------